राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी ५% आरक्षण

सर्व समावेशक सूचना.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०००३२
दिनांक ०१ जुलै, २०१६

वाचा:-

१. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,क्र. राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दि.२१ जून, २००६
२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दि.१८ नोव्हेंबर, २००६
३. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. संक्रीआ-१००६/प्र.क्र.१८२/क्रीयुसे-२ दि. ६ मे , २००८
४. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.संक्रीआ-२००७/(प्र.क्र.३२९/०७) क्रीयुसे-२ दि.११ जुलै, २००८
५. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.क्रीअसो-१९०८/(प्र.क्र.३९४/०८)क्रीयुसे-२दि.२१ ऑगस्ट, २००८
६. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.क्रीस्पर्धा-२१०८/(प्र.क्र.५३८/०८) क्रीयुसे-२ दि.१४ जुलै, २००९
७. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.संक्रीआ-२०१०/(प्र.क्र.२७०/१०)क्रीयुसे-२ दि.१७ ऑगस्ट, २०१०
८.शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,क्र.संक्रीआ- २१०८/(प्र.क्र.४४०/०८)क्रीयुसे-२ दि.२० सप्टेंबर, २०१३
९. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.संक्रीर्ण-१७१४/प्र.क्र.३२५/क्रीयुसे-२ (आदिवासी क्रीडा स्पर्धा) दि.२२ एप्रिल, २०१५
१०. सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.४०४/कार्या.१२,दि. २५ एप्रिल,२०१६
११. महिला व बालविकास विभाग, क्र.८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२,दि. २५ मे,२००१

प्रस्तावना :-

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धामध्ये पदके प्राप्त करणारे खेळाडू राष्ट्रास तसेच राज्यास लौकिक प्राप्त करुन देत असतात. खेळाडूंना खेळामध्ये प्राप्त होणाऱ्या संधी व शैक्षणिक अर्हता मिळविण्याचा कालावधी एकच असल्याने त्यांना दोन्ही आघाडींवर सारख्याच प्रमाणात लक्ष देता येणे शक्य नसते. बऱ्याचदा त्यांची शैक्षणिक क्षेत्रात पिछेहाट होते व त्यामुळे नोकरी व्यवसायाच्या स्पर्धेत ते अन्य विद्यार्थ्यांशी स्पर्धा करु शकत नाहीत. ही बाब विचारात घेऊन शासनाने विविध शासकीय विभागात व शासनाच्या मालकीच्या व नियंत्रणाखाली असलेल्या महामंडळात, स्थानिक प्राधिकरणात व शासकीय सवलती प्राप्त केलेल्या संस्थांमध्ये नोकरीसाठी अत्त्युच्च गुणवत्ताप्राप्त खेळाडूंकरिता ५% आरक्षण ठेवण्याचा निर्णय दिनांक ३०.०४.२००५ च्या शासन निर्णयानुसार घेतला. या शासन निर्णयानुसार संबंधित विभागामार्फत पदभरतीसाठी प्रथम अर्ज मागविण्यात येतात. अर्ज केलेल्या सर्व खेळाडू अर्जदारांची क्रीडा विषयक पात्रतेबाबतची प्रमाणपत्रे, ते लेखी परिक्षेत पात्र झाल्यानंतर संबंधित विभागाकडून प्रमाणित करण्याकरिता आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे पाठविण्यात येतात. खेळाडूंचे, संघटना सचिवांचे व विद्यापीठ संचालकांचे प्रतिज्ञापत्र प्राप्त करुन घेवून

त्यानुसार आयुक्तालयाव्दारे प्रस्तावांची पडताळणी करुन संबंधित विभागास पात्र/अपात्र अहवाल पाठविण्यात येतो.

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, बऱ्याच खेळाडू उमेदवारांना शासन निर्णयातील तरतुदीची माहिती नसल्यामुळे पात्रता नसतानाही पदभरतीसाठी अर्ज भरले जातात खेळाडू क्रीडा विषयक पात्रता धारण करीत नसताना लेखी परीक्षा उत्तीर्ण झाल्यास योग्य खेळाडू न मिळाल्यामुळे ५% आरक्षणातील पद रिक्त राहते व इतर अनेक अनेक समस्या उद्भवतात. काही खेळाडू पडताळणीअंती अपात्र असल्याचे संचालनालयामार्फत कळविल्यानंतर त्या विरोधात मा.प्रशासकीय न्यायाधिकरण व मा.उच्च न्यायालयामध्ये निर्णयाचे विरोधात याचिका दाखल करतात.

वरील परीस्थिती विचारात घेता खेळाडू आरक्षणांतर्गत होणारी भरती प्रक्रिया अधिक पारदर्शक / सुटसुटीत व्हावी यादृष्टीने प्रचलित तरतूदीमध्ये सुधारणा करून सुधारित शासन निर्णय निर्गमित करावयाची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>** :

या शासन निर्णयाव्दारे खेळाडूंसाठीच्या ५% आरक्षणाबाबतचा मूळ शासन निर्णय दिनांक ३०.०४.२००५ व त्यानंतर या विभागाने निर्गमित केलेले सर्व शासन निर्णय, परिपत्रक, पत्र इ. अधिक्रमित करण्यात येत असून नोकरीत ५% आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या खेळाडूंसाठी पुढीलप्रमाणे सुधारित आदेश देण्यात येत आहेत:-

१ **<u>खेळाडू विषयक आरक्षण लागू असलेली कार्यालये :-</u>**

सदर शासन निर्णय शासकीय/ निमशासकीय कार्यालय/ शासकीय उपक्रमातील सांविधानिक संस्था/जिल्हापरिषदा/ पंचायत समित्या / ग्रामपंचायती/ नगरपरिषदा/ नगरपालिका/ महानगरपालिका/ मंडळे/ महामंडळे/ शासनाचे अंगीकृत व्यवसाय/ विद्यापीठे/ कृषी विद्यापीठे /शासकीय शिक्षण संस्था आश्रमशाळांसह/सहकारी संस्था/ सहकारी साखर कारखाने/ सहकारी सूतगिरण्या/बॅका/सहकारी बँका/सहाय्यक अनुदान मिळणाऱ्या शासन मान्य स्वेच्छा संस्था यांच्यासह अन्य ज्या ज्या प्रकारच्या संस्था व कार्यालये यांना राज्याच्या तिजोरीतून निधी/ अनुदान/ सहाय्यक अनुदान मिळते अशा सर्व प्रकारच्या संस्था/मंडळे यांना त्यांच्या आस्थापनेवरील पदावर खेळाडूंसाठी ५ % आरक्षण (समांतर आरक्षण) लागू करणे बंधनकारक राहील.

२. **<u>क्रीडा विषयक अर्हता</u>**:-

| गट | क्रीडा विषयक अर्हता (परिशिष्ट अ प्रमाणे) | खेळविषयक पात्रता | |
|---|---|---|---|
| | | **वैयक्तिक स्पर्धा** | **सांधिक स्पर्धा** |
| अ | i) अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धा (वरिष्ठ गट)<br>ii) पॅरा ऑलिम्पिंक आंतरराष्ट्रीय स्पर्धा<br>iii) जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा | महाराष्ट्राच्या खेळाडूने भारताचे प्रतिनिधित्व करताना प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान /सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक | महाराष्ट्राच्या खेळाडूचा समावेश असलेल्या भारतीय संघाने प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान /सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक मिळविणे आवश्यक |

| | | | |
|---|---|---|---|
| | iv) आंतरराष्ट्रीय शालेय महासंघा- द्वारा आयोजित जागतिक शालेय क्रीडा स्पर्धा<br>v) ग्रॅन्डमास्टर किताब | मिळविणे आवश्यक/ ग्रॅन्डमास्टर किताब अथवा ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत सहभाग | |
| **ब** | i) अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धा (कनिष्ठ गट)<br>ii) राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा ( वरिष्ठ गट)<br>iii) पॅरा ऑलिम्पिंक राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा<br>iv) राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा<br>v) राष्ट्रीय ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धा<br>vi) अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धा<br>vii) आंतरराष्ट्रीय मास्टर स्पर्धा | महाराष्ट्राच्या खेळाडूने भारताचे प्रतिनिधित्व करताना /महाराष्ट्राचे /विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करताना प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान/ सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक मिळविणे आवश्यक/ अथवा)आंतरराष्ट्रीय मास्टर किताब मिळविणे आवश्यक | महाराष्ट्राच्या खेळाडूचा समावेश असलेल्या भारतीय संघाने /महाराष्ट्राच्या/ विद्यापीठाचे संघाने प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान/ सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक मिळविणे आवश्यक/ ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत सहभाग |
| **क** | i) राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा ( कनिष्ठ गट)<br>ii) राज्य स्तरावरील वरिष्ठ क्रीडा स्पर्धा<br>iii) राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धा<br>iv) ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धा<br>v) राज्यस्तर आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा (अश्वमेध)<br>vi) राज्यस्तर आदिवासी क्रीडा स्पर्धा<br>vii) राज्यस्तर पॅरा ऑलिम्पिंक क्रीडा स्पर्धा<br>viii) राज्यस्तर अपंग क्रीडा स्पर्धा | राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेमध्ये महाराष्ट्राचे/राज्य स्तरावर संबंधित विभाग/जिल्हयाचे प्रतिनिधित्व करून प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान/ सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक मिळविणे आवश्यक | राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेमध्ये महाराष्ट्राचे/राज्य स्तरावर संबंधित विभाग/जिल्हयाचे प्रतिनिधित्व करून संघाने प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान/ सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक मिळविणे आवश्यक |

| | | | |
|---|---|---|---|
| **ड** | i) राज्यस्तर कनिष्ठ गटातील क्रीडा स्पर्धा | प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान /सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक मिळविणे आवश्यक | संघाने प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान /सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक मिळविणे आवश्यक |
| | ii) राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा वरिष्ठ गट | वरिष्ठ गट स्पर्धेत सहभाग | वरिष्ठ गट स्पर्धेत सहभाग |
| | iii) पॅरा ऑलिम्पिक राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा | वरिष्ठ गट स्पर्धेत सहभाग | वरिष्ठ गट स्पर्धेत सहभाग |

पात्र स्पर्धांचा तपशील परीशिष्ट 'अ' मध्ये दिलेला आहे

**३. <u>स्पर्धाविषयक अन्य अटी व शर्ती :-</u>**

**(अ)** (i) उपरोक्त अ व ब गटातील स्पर्धा या संबंधित खेळाच्या आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीशी संलग्न असलेल्या आंतरराष्ट्रीय फेडरेशनने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा आंतराराष्ट्रीय समितीने स्वत: अथवा इंडियन ऑलिम्पिक असोशिएशन यांनी आयोजित केलेल्या असाव्यात.

(ii) उपरोक्त स्पर्धा व्यतिरिक्त संबंधित मान्यताप्राप्त खेळाच्या आंतरराष्ट्रीय फेडरेशनने/संबंधित खेळाच्या राष्ट्रीय फेडरेशनने आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यता प्राप्त स्पर्धेचे आयोजन केलेले असावे. यामध्ये सहभागी होणा-या खेळाडूंची निवड ही राष्ट्रीय संघातून झालेली असावी वैयक्तिकरित्या आयोजित केलेल्या किंवा आमंत्रित स्वरुपाच्या स्पर्धामध्ये भाग घेतलेल्या खेळाडूंचा यासाठी विचार करता येणार नाही.

(iii) राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धाचे आयोजन भारतीय ऑलिम्पिंक समितीशी संलग्न असलेल्या संबंधित खेळाच्या राष्ट्रीय फेडरेशनने/संघटनेने केलेले असावे.

(iv) राज्य क्रीडा अजिंक्यपद स्पर्धांचे आयोजन महाराष्ट्र ऑलिम्पिक असोशिएशनशी संलग्न असलेल्या संबंधित खेळाच्या राज्य संघटनेने केलेले असावे.

(v) एकविध खेळ संघटनेद्वारा आयोजित राष्ट्रीय स्पर्धा असल्यास स्पर्धा काळात सदर राष्ट्रीय संघटनेस इंडियन ऑलिम्पिंक असोसिएशनची **(IOA)** आणि महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनची **(MOA)** संलग्नता असणे हा निकष अनिवार्य राहील.

(vi) एकविध खेळ संघटनेद्वारा आयोजित राज्य स्पर्धा असल्यास स्पर्धा कालावधीत सदर राज्य संघटनेस महाराष्ट्र ऑलिम्पिंक असोसिएशनची **(MOA)** संलग्नता असणे हा निकष अनिवार्य राहील.

**(आ)** (i) जागतिक आंतरविद्यापीठ स्पर्धा ही आंतरराष्ट्रीय आंतरविद्यापीठ स्पोर्टस बोर्ड द्वारा आयोजित केलेल्या असाव्यात.

(ii) तसेच अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धा ह्या अखिल भारतीय विद्यापीठ क्रीडा बोर्डामार्फत आयोजित केलेल्या असाव्यात.

(iii) राज्यस्तर आंतरविद्यापीठ स्पर्धांचे (अश्वमेध) आयोजन संबंधित विद्यापीठाने केलेले असावे.

**(इ)** (i) पॅरा ऑलिम्पिंक आंतरराष्ट्रीय स्पर्धा या संबंधित खेळाच्या आंतरराष्ट्रीय पॅरा ऑलिम्पिंक समितीशी संलग्न असलेल्या आंतरराष्ट्रीय पॅरा ऑलिम्पिंक समितीने स्वत :आयोजित केलेल्या असाव्यात. तसेच उपरोक्त स्पर्धा व्यतिरिक्त असलेल्या स्पर्धा मान्यता प्राप्त खेळांच्या असून आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यता प्राप्त संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात यामध्ये सहभागी होणा-या खेळाडूंची निवड ही राष्ट्रीय संघातून झालेली असावी. वैयक्तिकरित्या किंवा आमंत्रित स्वरुपाच्या स्पर्धा मध्ये भाग घेतलेल्या खेळाडूंचा यासाठी विचार करता येणार नाही.

(ii) राष्ट्रीय व राज्यस्तर पॅरॉलिम्पिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन संबंधित पॅरॉलिम्पिक खेळ संघटनेने केलेले असावे.

(iii) अपंग क्रीडा स्पर्धांचे आयोजन हे आयुक्त, अपंगकल्याण विभाग यांच्यामार्फत करण्यात आलेल्या असाव्यात.

**(ई)** (i) आंतरराष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा हया आंतरराष्ट्रीय शालेय क्रीडा महासंघाद्वारा आयोजित केलेल्या असाव्यात.

(ii) राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा हया भारतीय शालेय क्रीडा महासंघाद्वारा आयोजित केलेल्या असाव्यात.

(iii) राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धा महिला व ग्रामीण क्रीडा स्पर्धाचे आयोजन (राजीव गांधी खेल अभियान अंतर्गत) क्रीडा व युवक सेवा संचालनालय मार्फत केलेले असावे.

**(उ)** (i) राज्यस्तर अदिवासी क्रीडा स्पर्धांचे आयोजन हे आयुक्त, अदिवासी विकास विभागामार्फत करण्यात आलेले असावे.

**(ऊ)** केंद्रशासनाद्वारा यापूर्वी भारतीय खेळप्राधिकरण/पंचायत युवा व क्रीडा अभियाना अंतर्गत आयोजित झालेल्या व आता राजीव गांधी खेलअभियान अंतर्गत आयोजित केल्या जात असलेल्या ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धा (वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धा ) ह्या भारतीय खेळप्राधिकरण द्वारा आयोजित केलेल्या असाव्यात.

**(ए)** आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सांघिक/ वैयक्तिक स्पर्धेमध्ये किमान १२ देशांच्या संघाचा /वैयक्तिक स्पर्धेमध्ये (वैयक्तिक क्रीडा प्रकार/प्रत्येक वजनी गटात) स्वतंत्रपणे किमान १२ खेळाडूंचा समावेश असावा. सर्व प्रकारच्या राष्ट्रीय/राज्य अजिंक्यपद स्पर्धेमध्ये किमान ६०% राज्य/जिल्हे सहभागी होणे आवश्यक राहील.

## ४. <u>सर्वसाधारण अर्हता:-</u>

(i) खेळाडू हा महाराष्ट्राचा रहिवाशी असावा व त्याला मराठीचे ज्ञान असावे.

(ii) सदर खेळाडू संबंधित पदाच्या सेवा प्रवेश नियमातील तरतूदीनुसार पदासाठी आवश्यक असणारी किमान शैक्षणिक व इतर अर्हता प्राप्त करणारा असावा.

(iii) खेळाडूंसाठी असलेल्या आरक्षणातून सरळसेवेने नेमलेला उमेदवार हा आरक्षण बिंदू नामावलीमध्ये त्या त्या प्रवर्गामध्ये गणला जाईल उदा. अनुसूचित जातीचे खेळाडू व्यक्ती ही अनुसूचित जातीच्या आरक्षणाच्या बिंदूवर गणली जाईल.

(iv) राज्य शासनाच्या सेवेत यापूर्वीच असलेल्या उमेदवारांना त्यांनी क्रीडा क्षेत्रात अधिक वरिष्ठ स्थान अथवा पदक प्राप्त केल्यास व ते शैक्षणिक अर्हता वयोमर्यादा इत्यादी बाबींसह पात्र असल्यास वरिष्ठ जागेसाठी ते अर्ज करण्यास पात्र राहतील.

(v) खेळाडू उमेदवारांनी अर्ज करण्यापूर्वीच सुधारीत तरतूदीनुसार विभागीय उपसंचालक यांचेकडून खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे. त्यामुळे खेळाडू उमेदवाराने अर्जासोबतच विभागीय उपसंचालक यांनी क्रीडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो याबाबत प्रमाणित केलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

(vi) खेळाडूंसाठी विहित करण्यात आलेले सदर ५ टक्के आरक्षण गट-अ, ब, क आणि ड या गटातील पदांच्या सरळसेवा भरतीसाठी अनुज्ञेय राहील.

(vii) खेळाडूची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन सदर पदासाठी सेवाप्रवेश नियमानुसार विहित असलेल्या वयोमर्यादेत ५ वर्षापर्यत वयाची अट शिथील करण्यात यावी. तथापि वयोमर्यादेत ५ वर्षासाठी वयाची अट शिथील करताना कोणत्याही प्रवर्गाच्या उमेदवारांची उच्चतम वयोमर्यादा ४३ वर्षे राहिल.

(viii) सदरचे आरक्षणाकरिता सामान्य प्रशासन विभागामार्फत विहित केलेली कार्यपध्दती व निकष व वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशानुसार कार्यवाही होईल.

(ix) एकाकी पदास आरक्षण लागू राहणार नाही.

(x) आरक्षण हे पदनिहाय व वेतनश्रेणीनिहाय असेल.

(xi) समांतर आरक्षण हे कप्पीकृत (compartmentalized) आरक्षण असल्याने त्यातील संवर्गात बदल करता येणार नाही व आरक्षणाचा अनुशेष पुढे नेता येणार नाही. तसेच भरतीच्या वर्षात त्या त्या प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमार्फत भरण्यात यावे. महिलांच्या आरक्षणाचा अनुशेष पुढे ओढण्यात येवू नये.

(xii) एखादा उमेदवार अ गटातील नेमणूकसाठी पात्र असेल तर त्याने ब, क किंवा ड गटासाठी अर्ज केल्यास त्याचा विचार करण्यास हरकत नाही. परंतु त्याच बरोबर संबंधित उमेदवाराने अ गटासाठीचे पद उपलब्ध झाल्यावर अर्ज केल्यास त्याचा नियमानुसार विचार करण्यात यावा. याचप्रमाणे गट-ब व क गटासाठी पात्र उमेदवारांचा विचार करण्यात यावा. मात्र ड, क व ब गटासाठी पात्र उमेदवार त्याच्या वरिष्ठ गटासाठी अर्ज करण्यास पात्र राहणार नाही. तथापि कोणत्याही गटामध्ये अर्ज करताना त्या गटातील पदाच्या सेवा प्रवेश नियमातील तरतूदींनुसार संबंधित उमेदवाराने अर्हता धारण करणे आवश्यक राहील.

## ५. क्रीडा प्रमाणपत्राची वैधता पडताळणी :-

(i) खेळाडूस वर नमूद केल्याप्रमाणे खेळविषयक अर्हता प्राप्त करून प्रमाणपत्र मिळाल्यानंतर सदर प्रमाणपत्र छानननी करण्यासाठी व छानननी अंती योग्यता सिध्द झाल्यास अ, ब, क व ड संवर्गापैकी कोणत्या संवर्गासाठी पात्र आहे याची नोंद करण्यासाठी खेळाडू ज्या क्रीडा विभागात वास्तव्यास आहे त्या विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, यांच्याकडे तात्काळ पाठवावीत.

(ii) अधिकृत एकविध संघटनेच्या प्रमाणपत्राची छाननी तसेच आदिवासी, अपंग व अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेच्या प्रमाणपत्राची छाननी संबंधित विभागीय उपसंचालक यांना करता यावी याकरिता संबंधित स्पर्धा आयोजकांनी स्पर्धेचे आयोजन झाल्यापासून ३० दिवसांमध्ये त्या स्पर्धेतील खेळाडूंचे संपूर्ण रेकॉर्ड / स्पर्धेचे अधिकृत निकाल व्यवस्थितरित्या जतन करुन संबंधित संघटनेच्या विद्यमान अध्यक्ष / सचिव यांच्या स्वाक्षरीने त्याची प्रत सर्व विभागीय उपसंचालक व क्रीडा संचालनालयाकडे पाठविणे आवश्यक राहील. सदर अहवाल संबंधित विभागीय उपसंचालक यांना विहित मुदतीत प्राप्त न झाल्यास संबंधित संघटनेस विभागीय उपसंचालक ७ दिवसात अहवाल सादर करण्याबाबत कळवतील. या मुदतीतही अहवाल प्राप्त न झाल्यास संबंधित विभागीय उपसंचालक यांना संबंधित खेळाडूला त्याच्या प्रमाणपत्राचा पडताळणी अहवाल पाठविणे शक्य होणार नाही व यामुळे खेळाडूच्या होणाऱ्या नुकसानीने संबंधित खेळालाच गालबोट लागेल व त्यास संबंधित खेळ संघटना जबाबदार राहील.

(iii) सदर खेळविषयक प्रमाणपत्र खेळाडूंकडून पडताळणीसाठी प्राप्त झाल्यानंतर संबंधित विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांनी त्यांची संघटनेकडून प्राप्त झालेल्या निकालाच्या आधारे सर्व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर पडताळणी करून प्रमाणपत्र योग्य असल्याची खात्री करून सदर क्रीडा प्रमाणपत्र अ, ब, क व ड या संवर्गापैकी कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो याबाबतचा स्पष्ट उल्लेख करुन परिशिष्ट “क” नुसार प्रमाणित प्रमाणपत्र खेळाडूस पाठवावे. तसेच सदर अहवाल क्रीडा विभागाच्या संकेतस्थळावर अपलोड करावा. उपसंचालकांद्वारे वरील पूर्ण कार्यवाही खेळाडूकडून आवश्यक कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर व संघटनेकडून निकालासंदर्भात आवश्यक कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर २० कार्यालयीन दिवसाच्या आत करण्यात येईल.

(iv) संबंधित विभागीय उपसंचालकांनी प्रमाणपत्राची तपासणी केल्यानंतर खेळाडूने सादर केलेले प्रमाणपत्र आरक्षणाचा लाभ घेण्यास अपात्र ठरत असल्यास याबाबतचा दिलेला निर्णय/अहवाल खेळाडूला डाकनोंद पत्राने कळविण्यात यावा. तसेच संकेतस्थळावर अपलोड करावा.

(v) संबंधित विभागीय उपसंचालक यांचेमार्फत कळविण्यात आलेल्या निर्णयावर खेळाडूला आक्षेप असल्यास याबाबत खेळाडूस निर्णय प्राप्त झाल्यापासून २ महिन्याचे आत सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा, शिवछत्रपती क्रीडासंकुल, महाळुंगे बालेवाडी, पुणे यांचेकडे प्रथम अपील करता येईल. प्राप्त होणाऱ्या अपीलावर सुनावणी घेवून निर्णय देण्याची कार्यवाही सहसंचालक, क्रीडा व युवकसेवा हे करतील. सहसंचालक क्रीडा व युवकसेवा यांच्या निर्णयावर आक्षेप असल्यास आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, पुणे यांच्याकडे व्दितीय अपिल करता येईल.

(vi) संबधित विभागीय उपसंचालक यांनी पडताळणी केलेल्या प्रमाणपत्राची माहिती क्रीडा विभागाच्या संकेतस्थळावर अपलोड करावी. जेणेकरुन संबंधित खेळाडूने नोकरीकरिता अर्ज केलेल्या विभागास सदरचे प्रमाणपत्र सदर संकेतस्थळावरील माहितीशी पडताळणी करुन पाहता येईल. याकरिता स्वतंत्र पत्रव्यवहार करण्याची गरज भासणार नाही. सदर माहिती संकेतस्थळावर अपलोड करण्यास सुमारे सहा महिन्यांचा कालावधी लागेल. दरम्यानच्या कालावधीत अर्जासोबत जोडलेल्या प्रमाणपत्राच्या आधारे पात्र अथवा अपात्रततेबाबत संबंधित भरती प्राधिकरणाने निर्णय घ्यावा व आवश्यकता वाटल्यास संबंधित विभागीय उपसंचालकाकडे शहानिशा करावी. तथापि माहीती संकेतस्थळावर अपलोड झाल्यानंतर संकेतस्थळावरील माहीतीशी पडताळणी करण्यात यावी.

(vii) एखाद्या खेळाडूकडे या शासन निर्णयाच्या पूर्वीच्या काळातील एकापेक्षा अधिक खेळांची राज्य/राष्ट्रीय स्पर्धेची प्राविण्य प्रमाणपत्रे असू शकतील अशा खेळाडूने एकाच वेळेस सर्व प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरिता संबंधित विभागीय उपसंचालक यांचेकडे हा शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून ३० दिवसाचे आत सादर करणे बंधनकारक राहील. त्यांनतर खेळातील प्राविण्य जेव्हा प्राप्त होईल तेंव्हा प्रमाणित करुन घ्यावीत.

(viii) खेळाडूने विभागीय उपसंचालकाकडून प्रमाणित प्रमाणपत्राचा अहवाल प्राप्त झाल्यावर या शासन निर्णयातील नियम क्र.४ नुसार अ/ब/क/ड गटातील संवर्गाकरिता आवश्यक असलेल्या क्रीडा अर्हतेनुसार संबंधित पदाच्या भरतीसाठी जाहिरात आल्यास अर्ज करताना सदर पडताळणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत अर्जासोबत जोडावी. अर्जासोबत पडताळणी प्रमाणपत्राची प्रत असल्याशिवाय खेळाडूच्या अर्जाचा खेळाडू संवर्गातून विचार होणार नाही.

(ix) यापुढे लोकसेवा आयोग तसेच अन्य सर्व पदभरतीसाठी सदर कार्यपध्दती लागू राहिल.

<u>६. शासकीय विभाग/कार्यालयांनी करावयाची कार्यवाही</u> :-

i) सदर शासन निर्णय लागू असलेल्या शासकीय विभाग/कार्यालयानी ५ टक्के आरक्षणांतर्गत क्रीडा संवर्गातून अ, ब, क व ड पद वर्गातील भरतीसाठी जाहिरात देताना जाहीरातीमध्ये सदर शासन निर्णयासोबतच्या परीशिष्ट 'अ' मध्ये नमूद असलेल्या पात्र स्पर्धांचा/खेळांचा उल्लेख करावा.

ii) खेळाडूंच्या सदर आरक्षणाची अंमलबजावणी करताना अनु. जाती, अनु. जमाती, विमुक्त जाती (अ) , भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्ग, खुला प्रवर्ग यांचेसाठी जी पदे उपलब्ध होतील. त्या त्या प्रवर्गातील ५ टक्के जागा राखीव ठेवण्यात याव्यात.

iii) खेळाडूंचे आरक्षण समांतर आरक्षण राहिल व ते कार्यान्वित करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रक -क्र.एआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/-१६-अ, दि.१६.३.१९९९ मधील मार्गदर्शक सूचनानुसार कार्यवाही करावी. सदर मार्गदर्शक सूचनामध्ये सामान्य प्रशासन विभागाकडून काही बदल केल्यास सदर बदल आपोआप लागू होतील.

iv) खेळाडूंसाठी विहित करण्यात आलेले सदर ५ टक्के आरक्षण हे फक्त सरळसेवा भरतीसाठी अनुज्ञेय राहील.

v) खेळाडू आरक्षण हे समातंर आरक्षण / विशेष आरक्षण असल्यामुळे आडवे आरक्षण आहे. समांतर आरक्षण हे कप्पीकृत आरक्षण असल्यामुळे पदे भरण्यापूर्वी, पदे निश्चित करताना तसेच भरतीची जाहिरात देताना त्या जाहिरातीत खेळाडू आरक्षणानुसार येणा-या राखीव पदांची संख्या सामाजिक आरक्षण उभे आरक्षण यांच्या (जसे अ, जा, अ.ज., वि. जा, (अ), भ.ज. (ब), (क), (ड) वि.मा,प्र., इमाव, खुला प्रवर्ग ) प्रत्येक वर्गामध्ये निर्देशित करावी.

vi) खेळाडूची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन सदर पदासाठी सेवाप्रवेश नियमानुसार विहित असलेल्या वयोमर्यादेत ५ वर्षापर्येत वयाची अट शिथील करण्यात यावी. तथापि वयोमर्यादेत ५ वर्षासाठी वयाची अट शिथील करताना कोणत्याही प्रवर्गाच्या उमेदवारांची उच्चतम वयोमर्यादा ४३ वर्षे राहिल.

vii) सदरचे आरक्षणाकरिता सामान्य प्रशासन विभागामार्फत विहित केलेली कार्यपध्दती व निकष व वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

viii) खेळाडू उमेदवारांनी अर्ज करण्यापूर्वीच वरील सुधारीत तरतूदीनुसार विभागीय उपसंचालक यांचेकडून खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे. त्यामुळे खेळाडू उमेदवाराने अर्जासोबतच विभागीय उपसंचालक यांनी क्रीडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो याबाबत प्रमाणित केलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

ix) वरीलप्रमाणे पडताळणी केलेल्या क्रीडा प्रमाणपत्राची प्रत अर्जासोबत असल्याशिवाय सदर खेळाडूच्या अर्जाचा खेळाडू संवर्गातून विचार करण्यात येऊ नये.

x) संबंधित विभागाने खेळाडू उमेदवाराकडून प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करतेवेळी त्यासोबत परीशिष्ट ब मधील प्रमाणित प्रमाणपत्र असल्याची खात्री करावी. तसेच क्रीडा विभागाच्या संकेतस्थळावरील माहितीशी पडताळणी करावी. त्यानंतरच अर्जदारास भरतीविषयक पुढील प्रक्रीयेसाठी पात्र ठरवावे.

xi) खेळाडूबाबतची माहिती संकेतस्थळावर अपलोड करण्यास सुमारे सहा महिन्यांचा कालावधी लागेल. दरम्यानच्या कालावधीत अर्जासोबत जोडलेल्या प्रमाणपत्राच्या पडताळणी करण्याकरिता भरती प्राधिकरणाने संबंधित विभागीय उपसंचालक क्रीडा व युवक सेवा यांचेकडे पत्राव्यवहार करावा. विभागीय उपसंचालक यांनी संबंधित खेळाच्या संघटनेच्या कागदपत्रांच्या आधारे विभागाच्या विभागीय उपसंचालक यांनी पडताळणी करावी. त्यानुसार पात्र अथवा अपात्रततेबाबत संबंधित भरती प्राधिकरणाने निर्णय घ्यावा. तथापि ६ महिन्यानंतर माहिती संकेतस्थळावर अपलोड झाल्यानंतर प्रमाणपत्राची पडताळणी संबंधित भरती प्राधिकरणाने संकेतस्थळावरील माहितीशी करण्यात यावी.

xii) क्रीडा प्रमाणप्रत्राची पडताळणी करण्यासाठी संबंधित विभागास आयुक्त/संचालक क्रीडा व युवक सेवा, पुणे यांच्याकडे पत्रव्यवहार करण्याची आवश्यकता नाही. प्रमाणपत्राबाबत काही शंका असल्यासच आयुक्त/संचालक क्रीडा व युवक सेवा, पूणे यांच्याकडे विचारणा करावी.

xiii) सदर शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून एक महिन्यानंतर होणा-या सर्व भरती प्रक्रीयेसाठी वरील कार्यपध्दती लागू हाईल.

हे आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या संमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०७०११६४९४३१३२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Charushila Devendra Chaudhary

Digitally signed by Charushila Devendra Chaudhary
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Charushila Devendra Chaudhary
Date: 2016.07.01 16:55:06 +05'30'

**(चारुशीला चौधरी)**
**उपसचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
२. मा.राज्यपालांचे सचिव
३. मा.मुख्यमंत्र्याचे सचिव
४. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. आयुक्त, क्रीडा व युवकसेवा,महाराष्ट्र राज्य,पुणे
६. संचालक, शिक्षण (प्राथमिक/माध्यमिक), महाराष्ट्र राज्य,पुणे
७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने)
८. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई(पत्राने)
९. लोकायुक्त, महाराष्ट्र, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,मुंबई (पत्राने)
१०.महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता),मुंबई/नागपूर
११.अधिदान व लेखाधिकारी,मुंबई
१२.निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई
१३.सर्व मंत्रालयीन विभाग
१४.सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुख
१५.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१६.सर्व शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद
१७.सर्व विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा

१८. सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी
१९.महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय,मुंबई
२०. निवड नस्ती, क्रीयुसे-२

## परिशिष्ट-अ

| गट- अ साठी पात्र क्रीडा स्पर्धा | गट-ब साठी पात्र क्रीडा स्पर्धा |
|---|---|
| १.अधिकृत आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा :-<br>I) ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा.<br>II) एशियन्स गेम्स.<br>III) जागतिक क्रीडा स्पर्धा.<br>IV) एशियन चॅम्पियशीप.<br>V) कॉमनवेल्थ गेम्स.<br>VI) कॉमनवेल्थ चॅम्पियनशीप.<br>VII) युथ ऑलिम्पिक.<br>VIII) ग्रॅडमास्टर (बुध्दिबळ) | गट अ पदाकरीता विहीत केलेली खेळ विषयक अर्हता धारण करणारा खेळाडू<br>अथवा<br>१. अधिकृत आंतरराष्ट्रीय कनिष्ठ गटातील :-<br>I) ज्युनियर वर्ल्ड चॅम्पियशीप<br>II) युथ कॉमनवेल्थ गेम्स<br>III) कनिष्ठ गटातील एशियन चॅम्पियनशीप<br>IV ) कनिष्ठ गटातील कॉमनवेल्थ चॅम्पियनशीप<br>v) आंतरराष्ट्रीय मास्टर स्पर्धा (बुध्दिबळ) |
| **२. पॅरॉलिम्पिंक आंतरराष्ट्रीय स्पर्धा :-**<br>I) पॅरॉलिम्पिक गेम्स.<br>II) पॅरा एशियन गेम्स.<br>III) वर्ल्ड पॅरॉलिम्पिक गेम्स. | **२) राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा वरिष्ठ गट :-**<br>I) राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा.<br>II) अधिकृत राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा (वरिष्ठ गट) |
| **३) जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा:-**<br>I) जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा बोर्डाने आयोजित केलेले खेळ. | **३) पॅरा ऑलिम्पिक राष्ट्रीय स्पर्धा :-**<br>I) पॅरा ऑलिम्पिक राष्ट्रीय अजिंक्य पद स्पर्धा |
| **४) आंतरराष्ट्रीय शालेय महासंघाद्वारा आयोजित जागतिक शालेय क्रीडा स्पर्धा :-**<br>आंतरराष्ट्रीय शालेय महासंघाद्वारे आयोजित केलेले खेळ . | **४ ) राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा .** |
| ५) ग्रॅन्ड मास्टर किताब | **५) राष्ट्रीय ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धा** |
| (टिप- उपरोक्त नमूद अ.क्र.१,३,व ४ या क्रीडा स्पर्धांना ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, एशियन गेम्स, कॉमनवेल्थ गेम्स या स्पर्धाचा समावेश असलेले **खेळ व बुध्दीबळ तसेच कबड्डी व खो-खो** हे देशी खेळच ५% आरक्षणासाठी पात्र राहतील) | ६) अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा<br>**७) आंतरराष्ट्रीय मास्टर स्पर्धा**<br>(टिप : अ.क्र.१,२,४,५, व ६ या स्पर्धांमधील ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, एशियन गेम्स, कॉमनवेल्थ गेम्स मध्ये समावेश असलेले खेळ व बुध्दीबळ तसेच कबड्डी व खो-खो हे देशी खेळच ५ % खेळाडू आरक्षणासाठी पात्र राहतील.) |

| **गट -क साठी पात्र क्रीडा स्पर्धा** | **गट-ड साठी पात्र क्रीडा स्पर्धा** |
|---|---|
| गट -अ व गट -ब या पदाकरीता विहीत केलेली खेळ विषयक अर्हता धारण करणारा खेळाडू<br>अथवा | अ/ ब / क या पदाकरीता विहित केलेली खेळ विषयक अर्हता धारण करणारा खेळाडू<br>अथवा |
| **१.राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा कनिष्ठ गट<br>I) राष्ट्रीय ज्यूनियर गट अजिंक्यपद स्पर्धा** | **१. राज्यस्तर कनिष्ठ गटातील अजिंक्यपद स्पर्धा** |
| **२.राज्य स्तर वरिष्ठ क्रीडा स्पर्धा<br>I)राज्यस्तर वरिष्ठ गटातील अजिंक्यपद स्पर्धा** | **२. वरिष्ठ गटातील राष्ट्रीय क्रीडा स्पर्धातील सहभाग** |
| **३. राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धा** | **३.पॅराऑलिम्पिक राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा वरिष्ठ गटातील सहभाग .** |
| **४) राज्यस्तर ग्रामिण व महिला क्रीडा स्पर्धा** | (टिप - अ.क्र.१ व २ मधील सर्व क्रीडा स्पर्धा मधील खेळ हे ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, एशियन गेम्स आणि कॉमनवेल्थ गेम्स मध्ये समावेश असलेले खेळ व बुध्दिबळ तसेच कब्बडी व खो-खो हे नमूद देशी खेळच ५ % खेळाडू आरक्षणासाठी पात्र असतील.) |
| **५) राज्यस्तर आंतरविद्यापीठ स्पर्धा (अश्वमेध)** | |
| **६) राज्यस्तर आदिवासी क्रीडा स्पर्धा** | |
| **७) राज्यस्तर पॅराऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा** | |
| **८) राज्यस्तर अपंग क्रीडा स्पर्धा** | |
| (टिप - अ.क्र.१ ते ५ मधील सर्व क्रीडा स्पर्धा मधील खेळ हे ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, एशियन गेम्स आणि कॉमनवेल्थ गेम्स मध्ये समावेश असलेले खेळ व बुध्दिबळ तसेच कब्बडी व खो-खो हे देशी खेळच ५ % खेळाडू आरक्षणासाठी असतील.) | |

## परिशिष्ट-ब

## FORM-1

(Specimen forms for represnting In India in an International Competition in one of the recognized Games/ sports.)

National Federation/ Association of in the game ……………………………….

…………………………………………….

Certified that Shri/Smt./Kumari………………………………………....

Son/Wife/Daughter of Shri…………………………………………………...

Resident of (complete address) …………………………………………………

represented India in the game/event of …………………….competition / tournament held at ……………..from ………….. to ……………………

The position obtained by the individual/ team in the above said Competition / Tournament was…………………………………….

This Certificate is being given on the basic of record available in the office of the National Federation/ National Association of ……………………..

Palce : Signature :

Date : Name :
Designation
Name of the federation/ National

Association……………………….

Address…………………………...

Seal……………………………….

Note: - This certificate will be valid only when signed personally by the Secretary of the authentic/ recognized National Association.

Place : …… Signature :

Date : Name :

Designation: Deputy Director,
Sports and Youth Services,
Maharashtra State,
…..........

## परिशिष्ट-ब

## FORM-2

(For representing a State in India in a National Competition in one of the recognized Games / Sports.)

Certificate to a meritorious sportsman for employment to Group B/C/D service under the State Government

State Association Of…………………………………… in the game of ……………………………………………

Certified that Shri/Smt./Kumari………………………………………....

Son/Wife/Daughter of Shri……………………………………………………...

Resident of (complete address) ………………………………………………

represented the State of Maharashtra in the game/event of…………….in the National Competition / Tournament held at ……………..

from ………….. to ……………………

The position obtained by the individual/ team in the above said Competition / Tournament was…………………………………….

This Certificate is being given on the basic of record available in the office of the National Federation/ National Association of ……………………..

Palce :

Date :

Signature :

Name :

Designation
Name of the federation/ National Association……………………….
Address…………………………...
Seal……………………………….

Note: - This certificate will be valid only when signed personally by the Secretary of the authentic/ recognized State Association.

Place :

Date :

Signature :

Name :

Designation: Deputy Director,
Sports and Youth Services,
Maharashtra State,
…..........

## परिशिष्ट-ब

## FORM-3

(For representing a District in Maharashtra in a State Competition in one of the recognized Games / Sports.)

Certificate to a meritorious sportsman for employment to Group C/D service under the State Government.

Single Games State Association of Maharashtra in the game of …………………………………………….

Certified that Shri/Smt./Kumari………………………………………....

Son/Wife/Daughter of Shri…………………………………………………...

Resident of (complete address) …………………………………………………

Represented District ……….. in the game/event of……………….….in the

State Competition / Tournament held at ……………..

from ………….. to ……………………

The position obtained by the individual/ team in the above said Competition / Tournament was…………………………………….

This Certificate is being given on the basic of record available in the office of the authentic / recognized State Association of Maharashtra.

Place : Signature :

Date : Name :
Designation
Name of the federation/ National Association……………………….
Address…………………………...
Seal……………………………….

Note: - This certificate will be valid only when signed personally by the Secretary of the authentic/ recognized State Association.

(Authentic /Recognied State Association means, association which is affiliated to Indian Olympic Federation a unit of Indian Olympic Association and Maharashtra Olympic Association)

Place : Signature :

Date : Name :
Designation: Deputy Director,
Sports and Youth Services,
Maharashtra State,
………...

## परिशिष्ट-ब

## FORM-4

(For representing a School Team in the School State competition organized by the Commissioner, Tribal Development, Govt. of Maharashtra OR Directorate of Sports and Youth Services of the State of Maharashtra.)

Certificate to a meritorious sportsman for employment to Group C/D service under the State Government.

Certified that Shri/Smt.…………………………………....Son/Daughter of Shri……………………………,Resident of Dist………..represented the School team in the competition……………..in the game held at ……………..

The position obtained by the individual/ team in the above said Competition was…………………… (First / Second / Third)

This Certificate is being given on the basic of record available in the office of the authentic / recognized State Association of Maharashtra.

Place : Signature :

Date : Name :

Designation:
D.S.O./Add.Comm.
Sports and Youth Services/Tribal Development,

………… ,Division………

Note: - This certificate will be valid only when signed personally by the Additional Commissioner, Tribal Development, Concerned Division.

Place : Signature :

Date : Name :
Designation : Deputy Director,
Sports and Youth Services,
Maharashtra State,
………...

## परिशिष्ट “क”

**डाकनोंद पोचपावती**
**गोपनीय**

क्र...................................
क्रीडा व युवकसेवा संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१
दिनांक :

**प्रति,**

**विषय:-** अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी आरक्षण ठेवणेबाबत.
श्री/श्रीमती.

**संदर्भ**:- आपले क्र. चे पत्र

महोदय,

उपरोक्त विषयावरील संदर्भांकित पत्राचे कृपया अवलोकन करावे.

आपल्या कार्यालयाच्या उपरोक्त संदर्भांकित पत्रासोबत उमेदवारांची क्रीडा विषयक कामगिरीची क्रीडा प्रमाणपत्रे पडताळणीच्या कार्यवाहीसाठी प्राप्त झालेली होती. यापैकी पुढील उमेदवाराचे क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीचा अहवाल खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे:-

| | | |
|---|---|---|
| १. | खेळाडूचे नांव | |
| २. | खेळ | |
| ३. | स्पर्धेचे नाव (प्रकार) | |
| ४. | स्पर्धेचा कालावधी | |
| ५. | स्पर्धेचे ठिकाण | |
| ६. | खेळाडूने केलेली क्रीडा विषयक कामगिरी (प्राविण्य) | |
| ७. | खेळाडूने सादर केलेल्या क्रीडा विषयक प्रमाणपत्रांचा क्रमांक | |
| ८. | शासन निर्णय | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग अन्वये क्रीडा प्रमाणपत्राची पडताळणी केलेली आहे. |
| ९. | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग दिनांक जून,२०१६ अन्वये क्रीडा प्रमाणपत्राची पडताळणी केली असता श्री..........................................उमेदवार गट-.... या पदाकरीता विहित केलेली खेळविषयक अर्हता पूर्ण करीत आहेत. | |

श्री................................................................. यांची उपरोक्त स्पर्धेतील कामगिरी विहित नमुन्यामध्ये प्रमाणित करून सोबत पाठविण्यात येत आहे. त्याप्रमाणे त्यांना आपल्या आस्थापनेवरील पदावर नियुक्ती दिल्यानंतर त्यासंबंधीचा अहवाल संचालनालयास पाठवावा.

आपला विश्वासू,

उपसंचालक
क्रीडा व युवकसेवा,महाराष्ट्र राज्य
....... विभाग,........

**सोबत मूळ प्रमाणपत्रे:-**

**प्रत माहितीस्तव:**
**श्री.**